नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 33 /२०२६ दि. ०४ /०२/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, नौपाडा वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०८/०२/२०२६ रोजी गजानन महाराज चौक, राम मारुती रोड येथे **गजानन महाराज यांचे प्रकट दिना सोहळा** होणार असुन सदर ठिकाणी मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी होणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद –	**१)** वंदना बस स्टॅन्ड, अल्मेडा सिग्नल कडुन गजानन महाराज चौक मार्गे पु.ना.गाडगीळ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारची वाहने बसेस जड/अवजड व मालवाहतूक वाहने यांना **गजानन महाराज चौक** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने बसेस तसेच सर्व जड/अवजड व मालवाहतूक वाहने गजानन महाराज चौक येथून उजवीकडे वळून सरळ पुढे तीन पेट्रोलपंप आराधना हरिनिवास सर्कल येथून पुढे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** राम मारूती रोडने पु.ना.गाडगीळ येथुन गजानन महाराज चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पु.ना. गाडगीळ चौक** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने पुना.गाडगीळ येथुन ग्रीन लिफ किंवा श्रध्दा वडापाव मार्ग इच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसूचना दिनांक ०८/०२/२०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर :–
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५, वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.